# Navjeevan Education Society

## NAVJEEVAN LAW COLLEGE NASHIK, CDCO, NASHIK

## NSS REGULAR ACTIVITY REPORT (EVENT/PROGRAM) (2025-26)

**1) आंतरराष्ट्रीय योग दिन अहवाल- दिनांक: २१ जून २०२५**

आंतरराष्ट्रीय योग दिन दरवर्षी २१ जून रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश योगाचे शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक महत्त्व जनजागृतीद्वारे समाजापर्यंत पोहोचविणे हा आहे. योग ही अशी प्राचीन भारतीय पद्धती आहे जी मन आणि शरीर यांना शांत ठेवण्यास, रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यास तसेच एकाग्रता सुधारण्यास मदत करते.

दि. २१ जून २०२५ रोजी नवजीवन लॉ कॉलेज येथे १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्राचार्य, प्राध्यापकवृंद, संचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. चव्हाणे यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व स्पष्ट करून केली. यानंतर वार्म-अप व्यायाम घेण्यात आले व विद्यार्थ्यांनी बसून आणि उभे राहून करावयाच्या विविध योगासनांचा सराव केला. प्रत्येक आसनाचे महत्त्व व त्याचे फायदे यांचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत योगासने सादर केली.

एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. शालिनी घुमारे (पेखळे) यांनी विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले व योगामुळे शारीरिक तंदुरुस्ती व मानसिक एकाग्रता कशी वाढते यावर मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. समीर चव्हाण व डॉ. प्रज्ञा सावरकर यांनीही योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमादरम्यान सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांना शरीर आणि मन यांच्यातील समतोल राखण्यासाठी योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी योगाचे महत्त्व चर्चेतून मांडले, विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर केले व आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याची प्रतिज्ञा केली. कार्यक्रमाचा समारोप डॉ. शालिनी घुमारे मॅडम यांनी आभार प्रदर्शनाने केला.






**2) रक्तदान शिबिर – २१ जुलै २०२५**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जनकल्याण ब्लड बँक, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात एकूण २१ रक्तपिशव्या संकलित करण्यात आल्या. डॉ. मकरंद पांडे, डॉ. समीर चव्हाण व डॉ. प्रज्ञा सावरकर यांनीही रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी दर्शविली.

**3) वृक्षारोपण – १५ ऑगस्ट २०२५**

महाविद्यालयाच्या NSS विभागामार्फत सिन्नर तालुक्यातील निरहळ येथे एकूण २०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमाचे उद्घाटन नवजीवन फाउंडेशनचे संचालक श्री. महेंद्र विंचूरकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




**4) गणपती विसर्जन सेवा उपक्रम**

नाशिक पंचवटी परिसरातील रामकुंड येथे गणेश विसर्जनाच्या वेळी स्वयंसेवकांनी नागरिकांना सहकार्य केले. कृत्रिम विसर्जन टाक्या उभारून गर्दी नियंत्रण व पर्यावरण संवर्धनासाठी स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले.

**5) "नवजीवन विधी महाविद्यालयात रेड रिबीन क्लब, एड्स जनजागृती उपक्रम" - दिनांक ३० ऑगस्ट २०२५**

नवजीवन विधी महाविद्यालयात दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी रेड रिबीन क्लब , एड्स जनजागृती पर उपक्रम राबविण्यात आला. जिल्हा रुग्णालय नाशिक आणि एन.एन.पी + संस्थेच्या सदस्यांनी यावेळी विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले. समुपदेशक श्रीमती योगिता चौधरी यांनी विद्यार्थ्यांना एच आय व्ही विषयी प्राथमिक माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. आरोग्य विभागाकडून तयार करण्यात आलेल्या हेल्पलाईन विषयी माहिती सांगितली. HIV/AIDS Act, 2017 या कायद्याविषयी ही विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे, एन एन पी+ चे श्री राज गमे, दिपाली वाघ आणि सर्व प्राध्यापक , १०० विद्यार्थी उपस्थित होते.








**6) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता मोहीम – २६ सप्टेंबर २०२५**

राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त सिन्नर तालुक्यातील निरहळ गावात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छतेसाठी श्रमदान करून स्वच्छतेबाबत जनजागृती केली.




**7) "वाचन प्रेरणा दिन" - दि. १५ ऑक्टोबर २०२५**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या १५ ऑक्टोबर जन्मदिवसानिमित्त नवजीवन महाविद्यालयात “वाचन प्रेरणा दिन” उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि ज्ञानाची कास धरावी या उद्देशाने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने महाविद्यालयात आकर्षक पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. विविध विषयांवरील प्रेरणादायी, शैक्षणिक व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचनाचे महत्त्व सांगत डॉ. कलाम यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. ग्रंथपाल श्रीमती मंगल पाटील तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्ग कार्यक्रमास उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पुस्तक प्रदर्शनाचा लाभ घेतला आणि वाचन संस्कृती जोपासण्याचा संकल्प केला.



**8) “वंदे मातरम” गीताचे सामूहिक गायन - दि- ०७ नोव्हेंबर २०२५**

दिनांक ७/११/२०२५ रोजी “वंदे मातरम” या गीतास १५० वर्षं पूर्ण होत आहेत. देशभावना जागृत होण्यासाठी या गीताने महत्वाची भूमिका बजावलेली आहे, या निमित्ताने नवजीवन विधी महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापकवृंद, इतर सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी "वंदे मातरम” गीताचे सामूहिक गायन केले. या वेळी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







**9) <u>जनजाती गौरव दिन (भगवान बिरसा मुंडा जयंती) -</u> दि. १५ नोव्हेंबर २०२५**

सन २०२५ हे वर्ष भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे शतकोत्सव सुवर्ण महोत्सवी वर्ष , १५० वर्ष) म्हणून साजरे करण्यात येत आहे. दि १५ नोव्हेंबर २०२५ रोजी “जनजाती गौरव दिन "म्हणून साजरा करण्यात येत आहे. हा दिवस महान आदिवासी स्वातंत्र्यसैनिक व समाजसुधारक भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो.

नवजीवन विधी महाविद्यालयात **१५ नोव्हेंबर** रोजी जनजाती गौरव दिन (भगवान बिरसा मुंडा जयंती) उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात उत्तम संयोजनाखाली झाली. प्रा. मकरंद पांडे यांनी कार्यक्रमातील प्रमुख पाहुणे ॲड. गुलाब करटूले यांची ओळख करून देत कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन केले. प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे यांनी प्रमुख पाहुणे ॲड. गुलाब करटूले यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.

यानंतर प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे यांनी उपस्थितांना संबोधित केले. आपल्या मनोगतात त्यांनी आदिवासी समाजाचे भारताच्या सांस्कृतिक वैविध्यातील महत्व आणि बिरसा मुंडा यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक योगदान यावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी आदिवासी समाजाच्या संघर्ष, परंपरा आणि मूल्यांमधून प्रेरणा घ्यावी असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून माननीय ॲड. गुलाब करटूले यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी “बिरसा मुंडा यांनी १९व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिशांच्या अत्याचाराविरुद्ध “**उलगुलान**” (महातांडव (चे नेतृत्व केले .त्यांच्या नेतृत्वामुळे आदिवासी समाजात स्वाभिमान, एकता आणि स्वातंत्र्याची भावना प्रबळ झाली”. इ. माहिती दिली. त्यांच्या भाषणातून जनजाती समाजाची शौर्यपरंपरा, सांस्कृतिक वारसा व राष्ट्रनिर्मितीतील योगदान यावर प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमास एकूण 95 विद्यार्थी व सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि शेवटी आभार प्रदर्शन श्री. जी. पी. खैरनार यांनी उत्कृष्टपणे पार पाडले.





10) **<u>नशामुक्ती जनजागृती मोहिम -</u> दि. १५ नोव्हेंबर २०२५**

दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी नवजीवन विधी महाविद्यालयात नशामुक्तीबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे , महाविद्यालयातील इतर मान्यवर प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमास 95 विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्यांनी नशामुक्तीचे सामाजिक व वैयक्तिक जीवनातील महत्त्व अधोरेखित करून केली. त्यांनी नशेचे दुष्परिणाम, त्याचे मानसिक, शारीरिक व सामाजिक परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यानंतर प्रा. मकरंद पांडे यांनी विद्यार्थ्यांना ‘नशापानाला नकार द्या’ (Say No to Drugs) शपथ घेण्यास प्रोत्साहित केले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत नशेमुक्त समाजासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. प्रा. मकरंद पांडे यांनी युवकांनी नशेपासून दूर राहण्याची व इतरांनाही प्रोत्साहित करण्याची गरज स्पष्ट केली.



**11) संविधान दिन – २६ नोव्हेंबर २०२५**

दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी नवजीवन लॉ कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत संविधान दिन मोठ्या उत्साहात व आदरभावाने साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. श्री. मकरंद पांडे सर यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाली. त्यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व, त्याची निर्मिती प्रक्रिया व ऐतिहासिक पार्श्वभूमी याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच Dr. Babasaheb Ambedkar यांची भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार म्हणून भूमिका स्पष्ट करताना त्यांनी भारतीय लोकशाहीच्या संरक्षणासाठी असलेल्या मूलभूत अधिकार व कर्तव्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

संविधान दिनाच्या निमित्ताने भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे (Preamble) सामूहिक वाचन करण्यात आले. सुमारे ८५ विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांनी अभिमानाने व आदराने प्रस्तावना वाचून न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या संविधानिक मूल्यांचे पालन करण्याची प्रतिज्ञा केली.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात भारतीय संविधान विषयक पुस्तकांचे Exhibition आयोजित करण्यात आले. ग्रंथपाल सौ. मंगल पाटील यांनी पुढाकार घेऊन इंग्रजी व मराठी भाषेतील सुमारे १०० संविधान विषयक पुस्तके प्रदर्शनासाठी मांडली.

महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते व त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून पुस्तक प्रदर्शनालाही भेट दिली.







**12) एड्स जनजागृती कार्यक्रम - १५ डिसेंबर २०२५**

दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी नवजीवन लॉ कॉलेज, नाशिक येथे जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा शासकीय रुग्णालय, नाशिक यांच्या वतीने एड्स जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे, प्राध्यापकवृंद तसेच अंदाजे ९५ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची माहिती श्रीमती चौधरी मॅडम, (जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग) यांनी विद्यार्थ्यांना दिली. त्यांनी एड्स म्हणजे काय, त्याचा प्रसार कसा होतो, प्रतिबंधात्मक उपाय, तसेच समाजातील गैरसमज याबाबत सविस्तर व सोप्या शब्दांत मार्गदर्शन केले.

तसेच प्रा. श्री. मकरंद पांडे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. त्यांनी एड्सबाबत जनजागृतीचे महत्त्व, युवकांची भूमिका आणि आरोग्याबाबत जबाबदार वर्तन ठेवण्याची गरज यावर मौलिक विचार मांडले.








**13) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती  (बालिका दिन) - दि. ३ जानेवारी २०२६**

दि. ३ जानेवारी २०२६ रोजी नवजीवन लॉ कॉलेज, नाशिक येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक व स्त्रीमुक्ती क्षेत्रातील अमूल्य कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमात डॉ. प्रज्ञा सावरकर( Associate Professor) यांनी प्रमुख मार्गदर्शनपर भाषण केले. आपल्या भाषणातून त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या महिलांच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्याचा, त्यांच्या संघर्षाचा आणि सामाजिक समतेसाठी दिलेल्या योगदानाचा सखोल आढावा घेतला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग व कर्मचारी तसेच सुमारे ४३ विद्यार्थी उपस्थित होते.




**14) राजमाता जिजाऊ जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती* (राष्ट्रीय युवा दिन)  – १२ जानेवारी २०२६**

नवजीवन लॉ कॉलेज नाशिक येथे दिनांक १२/०१/२०२६ रोजी राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.  कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. बी. चव्हाटे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित प्राध्यापकवर्ग व विद्यार्थ्यांनीही प्रतिमांना अभिवादन केले.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. पी. बी. चव्हाटे यांनी राजमाता जिजाऊ यांच्या संस्कारमूल्यांबद्दल व स्वामी विवेकानंद यांच्या विचारसरणीबद्दल सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी जीवनात चारित्र्य, आत्मविश्वास व राष्ट्रसेवा या मूल्यांचा अंगीकार करावा, असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले.




**15) भारतीय संविधान अमृत महोत्सव वर्षानिमित्त कार्यक्रम - दि. 07 फेब्रुवारी २०२६**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि नवजीवन विधी महाविद्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 07/02/2026 रोजी भारतीय संविधान अमृत महोत्सव वर्षानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात संविधान पूजन करून व संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करून करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा स्पष्ट केली तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री. जयेश क्षेमकल्याणी उपस्थित होते. तसेच निरीक्षक म्हणून के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक येथील श्री. विजय घोरपडे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरव गाजरे याने केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयक डॉ. शालिनी घुमरे तसेच सहाय्यक समन्वयक प्रा. वसुंधरा चौधरी यांच्यासह इतर प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

प्रमुख वक्त्यांनी भारतीय संविधानाची निर्मिती, संविधान सभेचे कार्य, तसेच संविधान जपण्याची प्रत्येक नागरिकाची जबाबदारी यावर सविस्तर भाष्य केले. संविधानामुळे देशात लोकशाही, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता टिकून राहते, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात

उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सुमारे 120 विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना भोजन देण्यात आले. गौरव गाजरे याने उपस्थित मान्यवर, प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.







**16) मतदान जनजागृती अभियान**

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या सहकार्याने मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले. CIDCO परिसरात दोन वेळा जनजागृती मोहीम आयोजित करण्यात आली.



**17) छत्रपती शिवाजी महाराज जयंती - दि. १९ फेब्रुवारी २०२६**

दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शिवप्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थिनी सानिका गिलबिले हिने प्रभावी "शिवगर्जना" सादर करून उपस्थितांमध्ये देशभक्तीची भावना जागृत केली. तसेच प्रा. हंसराज वाघुळे यांनी शिवाजी महाराजांच्या कार्यावर मार्गदर्शन करत त्यांच्या शौर्य, दूरदृष्टी आणि स्वराज्य स्थापनेच्या ध्येयाबद्दल विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचार मांडले.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.





**18) विविध कार्यशाळांमध्ये सहभाग**

RASEYO कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक विविध कार्यशाळांमध्ये नियमितपणे सहभागी होत असतात.

**19) वीर बाल दिवस**

नवजीवन विधी महाविदयालयात दि. २६/१२/२०२५ रोजी श्री. गोबिंदसिंहजी यांच्या प्रकाशवर्षाच्या निमित्ताने 'वीर बाल दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाकरीता मोठ्या संख्येने विदयार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे यांनी शीख धर्माचे दहावे गुरु श्री. गोबिंदसिंहजी यांचे चार सुपुत्र साहिबजादे बाबा अजितसिंह, बाबा जुझारसिंह, बाबा जोरावरसिंह व बाबा फतेहसिंह यांनी धर्म स्वातंत्र सत्य व न्यायाच्या रक्षणासाठी औलोकिक शौर्याने बलिदान दिले; ही घटना भारतीय इतिहासातील अव्दितीय शौर्याचे कसे प्रतिक आहे यावर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित विदयार्थ्यानमध्ये 'युवकांमध्ये राष्ट्रनिष्ठा व नैतिक मूल्यांचा प्रसार' या विषयावर गट चर्चा आयोजित करण्यात आली.



**20) आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण       दिनांक - ०९ जानेवारी २०२६**

आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण हे एक आवश्यक कौशल्य आहे, जे व्यक्तींना, विशेषतः मुलींना, शारीरिक इजा आणि धोक्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यास मदत करते. आजच्या समाजात, महिलांच्या सुरक्षेबाबत वाढत्या चिंतांमुळे आत्मसंरक्षणाची गरज अधिक महत्त्वाची झाली आहे. हे प्रशिक्षण केवळ वैयक्तिक सुरक्षेसाठी व्यावहारिक कौशल्येच देत नाही, तर आत्मविश्वास वाढवते, शिस्त रुजवते आणि मानसिक कणखरपणाला प्रोत्साहन देते

Adv. Jyoti D. Gangurde ( Self Defence Training for the Girl Students)आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण हे एक आवश्यक कौशल्य आहे, जे व्यक्तींना, विशेषतः मुलींना, शारीरिक इजा आणि धोक्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यास मदत करते. आजच्या समाजात, महिलांच्या सुरक्षेबाबत वाढत्या चिंतांमुळे आत्मसंरक्षणाची गरज अधिक महत्त्वाची झाली आहे. हे प्रशिक्षण केवळ वैयक्तिक सुरक्षेसाठी व्यावहारिक कौशल्येच देत नाही, तर आत्मविश्वास वाढवते, शिस्त रुजवते आणि मानसिक कणखरपणाला प्रोत्साहन देते






**21) नशा मुक्त भारत अभियान**

भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाद्वारे मार्गदर्शित 'नशा मुक्त भारत अभियाना'च्या (NMBA) अनुषंगाने, आज दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी नवजीवन विधी महाविद्यालय येथे व्याख्यान आणि अधिकृत शपथ ग्रहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. देशातील युवा पिढीला व्यसनाधीनतेच्या विळख्यातून सुरक्षित ठेवणे आणि एक सुदृढ समाज घडवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे 'नशा मुक्त भारत' शपथ ग्रहण केली. या शपथेच्या माध्यमातून अमली पदार्थांपासून दूर राहण्याची आणि समाजाला व्यसनमुक्त करण्यासाठी योगदान देण्याची वचनबद्धता व्यक्त करण्यात आली





**22) मराठी भाषा गौरव दिन व ग्रंथ प्रदर्शन सोहळा**

दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या ग्रंथालयात भव्य 'मराठी ग्रंथ प्रदर्शनाचे' आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज), पु. ल. देशपांडे, व. पु. काळे यांसारख्या दिग्गज साहित्यिकांच्या कादंबऱ्या, कवितासंग्रह आणि कथासंग्रहांसोबतच कायद्याची मराठीतील महत्त्वाची पुस्तके मांडण्यात आली होती. या प्रदर्शनाला नवजीवन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माननीय बडे सर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे यांनी विशेष भेट दिली. त्यांनी प्रदर्शनातील पुस्तकांचे बारकाईने निरीक्षण केले आणि दुर्मिळ ग्रंथसंग्रहाबद्दल ग्रंथालय विभागाचे विशेष कौतुक केले. "विद्यार्थ्यांनी केवळ कायद्याचा अभ्यास न करता अवांतर मराठी साहित्याचे वाचन करून आपली वैचारिक प्रगल्भता वाढवावी," असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट देऊन विविध विषयांवरील पुस्तकांची माहिती घेतली. अनेकांनी आपल्या आवडीच्या पुस्तकांची नोंदणी वाचनासाठी केली. प्राध्यापकांनी मराठी साहित्यातील बदलत्या प्रवाहावर चर्चा केली आणि विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त केले. प्रशासकीय कर्मचाऱ्यांनीही कामातून वेळ काढून प्रदर्शनाचा आनंद घेतला आणि आपल्या वाचनाची आवड जोपासली.








**23) विश्व मराठी संमेलनास विद्यार्थ्यांची भेट**

दिनांक **२६, २७, २८ फेब्रुवारी आणि ०१ मार्च २०२६** या कालावधीत मराठा विद्या प्रसारक समाजाचे **के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक** येथे **विश्व मराठी संमेलनाचे** आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाच्या निमित्ताने भाषा, साहित्य, उद्योजकता, उपक्रमशीलता तसेच विविध सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांवर आधारित व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, मुलाखती आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाला **नवजीवन लॉ कॉलेज, नाशिक** येथील **विद्यार्थ्यांनी** भेट देऊन विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी मराठी भाषा आणि साहित्याशी संबंधित विविध प्रदर्शनांचे तसेच पुस्तक प्रदर्शनाचे अवलोकन केले. संमेलनातील परिसंवाद आणि चर्चासत्रांमधून विद्यार्थ्यांना मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीबद्दल महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.

**24) आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यक्रम**

दिनांक **०९ मार्च २०२६** रोजी **नवजीवन लॉ कॉलेज, नाशिक** येथे **आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त** विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देश महिलांच्या अधिकारांबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच समाजातील महिलांचे योगदान अधोरेखित करणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी **महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल** चव्हाटे यांनी महिला सक्षमीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात महिलांनी शिक्षण, कायदा, सामाजिक क्षेत्र तसेच विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला आणि विद्यार्थ्यांना महिलांच्या अधिकारांबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.



**25) विविध कार्यशाळांमध्ये सहभाग**

RASEYO कार्यक्रम अधिकारी वस्वयंसेवक विविध कार्यशाळांमध्ये नियमितपणे सहभागी होत असतात.